# संचालनालय आरोग्य सेवा (महाराष्ट्र शासन)

शासकीय दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई-१.

पीबीएक्स दुरध्वनी कार्यालय : २६२१०३१ - ३६ विस्तार ११६/११७/१३८
महासंचालक : २६२१००६
सहसंचालक : २६२०२४९
सहाय्यक संचालक : २६२०२२०
तार : आरोग्य सेवा, मुंबई-४००००१.


क्र.संआसे/निविमु/उपकेंद्र/प्रस्ताव/टि-७/कक्ष-७/०४
दिनांक - २१ फेब्रुवारी, २००४.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद
रत्नागिरी (सर्व)

विषय - कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत उपकेंद्र स्थापनेबाबत...
संदर्भ - केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग निर्माण भवन, नवी दिल्ली यांचे (इंग्रजी) D.O.No.G.23011/16/2002-PA(Vol. II), Dated 6th February, 2004.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये केंद्र शासनास राज्यामध्ये ८०८ उपकेंद्र स्थापन करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी दिलेली आहे.

१) सन १९९१ च्या जनगणनेची ग्रामीण लोकसंख्या आधारभूत धरावी.
२) बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये दर ५००० लोकसंख्येस एक उपकेंद्र व आदिवासी/ डोंगराळ भागाकरिता दर ३००० ग्रामीण लोकसंख्येस एक उपकेंद्र
३) नवीन उपकेंद्र स्थापन करण्याकरिता रु.१०,०००/- प्रति उपकेंद्र सुरुवातीस केंद्र सरकारकडून देण्यात येईल.
४) आरोग्य सेवक (स्त्री) वेतनावरील खर्च राज्य सरकारच्या वेतनश्रेणीनुसार केंद्र सरकारमार्फत देण्यात येईल. मात्र पुरुष आरोग्य कर्मचा-याचे वेतन व इतर खर्च राज्य सरकारने करावयाचा आहे. अर्धवेळ स्त्री सदतनीस, प्रति ए.एन.एस. १ नेमणूक करता येईल. स्त्री आरोग्य कर्मचा-यास अर्धवेळ स्त्री परिचर दरमहा रु.१००/- मानधनावर नेमणूक करता येईल. प्रति उपकेंद्र प्रतिवर्षी रु.३०००/- इमारतीचे भाडे देण्याकरिता देय असेल. आकस्मिक खर्च अर्धवेळ स्त्री सदतनीसच्या मानधनासह रु.३२००/- प्रतिवर्षी देय राहील. उपकेंद्रास आवश्यक असणारे औषधे केंद्र सरकारकडून प्रजनन व बाल आरोग्य (RCH) कार्यक्रमांतर्गत प्राप्त होईल.

F. मासिक सभा 4/3/04

D:\T-7\Sub Centre Prastav

आरोग्य विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी
१) ... FEB 2004
२) ... ४॥॥
३) ... ९८०३
अ / शिका. क्र.

प्रत्येक ६ उपकेंद्रामागे १ एल.एच.व्ही नेमण्यात येईल व सदरील एल.एच.व्ही.च्या वेतनावरील खर्च केंद्र सरकारमार्फत करण्यात येईल.

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या तक्त्यातील आपल्या जिल्हयासमोर दर्शविण्यात आलेल्या संख्येनुसार उपकेंद्रांची स्थाननिश्चिती खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन प्रस्ताव सोबत जोडलेल्या नमुन्यात त्वरीत सादर करावा.

१) जिल्हा नियोजन विकास मंडळाने स्थाननिश्चिती केलेल्या उपकेंद्रांचीच निवड करण्यात यावी.

२) आदिवासी/ डोंगराळ तसेच बिगर आदिवासी उपकेंद्र स्थापन करतांना लोकसंख्येचा निकष पाळण्यात यावा.

३) स्थान निश्चिती करण्यात आलेले उपकेंद्र हे भौगोलिकदृष्ट्या योग्य असावे.

४) प्रस्तावित उपकेंद्राच्या ठिकाणी दुसरी कोणतीही आरोग्य संस्था कार्यरत नसावी.

५) उपकेंद्राकरिता भविष्यकाळात मोफत जागा उपकेंद्र इमारत बांधण्याकरिता प्राप्त होईल असा दाखला ग्रामपंचायतकडून घेण्यात यावा. उपकेंद्राचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात यावा.

सोबत आपल्या जिल्हयात कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रात स्थापन करावयाच्या उपकेंद्रांची संख्या दर्शविणारा तक्ता जोडला आहे.

महासंचालक आरोग्य सेवा
मुंबई.

प्रत - मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई..

DAT-7\Sub Centre Prastav

## कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत स्थापन करावयाची उपकेंद्रे

| अ.क्र. | जिल्हा | कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत स्थापन करावयाची उपकेंद्रे | | |
|---|---|---|---|---|
| | | आदिवासी / डोंगरी | बिगर आदिवासी | एकुण |
| 1 | ठाणे | 22 | 0 | 22 |
| 2 | रायगड | 2 | 9 | 11 |
| 3 | रत्नागिरी | 4 | 0 | 4 |
| 4 | नाशिक | 47 | 0 | 47 |
| 5 | धुळे | 13 | 8 | 21 |
| 6 | नंदुरबार | 22 | 14 | 36 |
| 7 | जळगांव | 3 | 43 | 46 |
| 8 | अहमदनगर | 4 | 66 | 70 |
| 9 | पुणे | 4 | 34 | 38 |
| 10 | सोलापूर | 0 | 102 | 102 |
| 11 | सातारा | 3 | 88 | 91 |
| 12 | कोल्हापूर | 3 | 38 | 41 |
| 13 | सांगली | 3 | 47 | 50 |
| 14 | सिंधुदुर्ग | 2 | 0 | 2 |
| 15 | औरंगाबाद | 2 | 29 | 31 |
| 16 | जालना | 0 | 42 | 42 |
| 17 | परभणी | 1 | 0 | 1 |
| 18 | हिंगोली | 1 | 0 | 1 |
| 19 | लातूर | 0 | 16 | 16 |
| 20 | उस्मानाबाद | 0 | 2 | 2 |
| 21 | बीड | 2 | 25 | 27 |
| 22 | नांदेड | 0 | 3 | 3 |
| 23 | अकोला | 1 | 0 | 1 |
| 24 | वाशिम | 0 | 1 | 1 |
| 25 | अमरावती | 0 | 13 | 13 |
| 26 | यवतमाळ | 58 | 3 | 61 |
| 27 | बुलढाणा | 1 | 15 | 16 |
| 28 | नागपूर | 3 | 0 | 3 |
| 29 | वर्धा | 0 | 1 | 1 |
| 30 | भंडारा | 1 | 0 | 1 |
| 31 | गोंदिया | 2 | 0 | 2 |
| 32 | चंद्रपूर | 3 | 0 | 3 |
| 33 | गडचिरोली | 2 | 0 | 2 |
| | एकुण | 209 | 599 | 808 |